स्थापना २ जून १९७५

|| विना सहकार नही उद्धार ||

# दि [illegible]ली को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि.,

मुंबई-३



# २२वा वार्षिक अहवाल १९९६-९७

ऑफिस : ढोबळे बिल्डिंग, रूम नं. ३७, तिसरा मजला, २६/२८,

जंजीकर स्ट्रीट कोळीवाडा, मुंबई - ४०० ००३.फोन . ३४२१५९५

रजि. नं. बी. ओ. एम्. / आर. एस. आर / ७०५ - १९७५

# दि [illegible]ांग व्हॅली को - ऑप. क्रेडिट सोसायटी लि. मुंबई - 3

## कार्यकारी मंडळ सन १९९६ ते २००१


आत्माराम नि. थोरात
संस्थापक / अध्यक्ष


शंकरराव रा. माटेकर
उपाध्यक्ष


बाबुराव तु. डाकवे
संस्थापक / सचिव


जयसिंग या बोत्रे
खजीनदार


शिवाजी ग. डाकवे
सदस्य


पांडूरंग रा. चव्हाण
उपसचिव


बाबुराव शं. सावंत
सदस्य


वसंतराव शं. रोडे
सदस्य


हिंदूराव वं. मोहिते
सदस्य


निवृत्ती वा. लोटळे
सदस्य


विष्णू कृ. तेटमे
सदस्य


राजाराम बा. कात्रे
सदस्य


बापुराव ल. पाटील
सदस्य


शंकर द. चव्हाण
सदस्य


अ[illegible]ा. नांगरे
[illegible]य

# दि वांगव्हॅली को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई-३

## ◆ संस्थापक ◆

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात

## ◆ कार्यकारी मंडळाचे पदाधिकारी ◆

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात, अध्यक्ष

श्री. शंकरराव रामचंद्र माटेकर, उपाध्यक्ष

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे, सचिव

श्री. पांडुरंग रामचंद्र चव्हाण, उपसचिव

श्री. जयसिंग यशवंत बोत्रे, खजिनदार

## ◆ कार्यकारी मंडळाचे सदस्य ◆

श्री. शिवाजीराव गणपती डाकवे

श्री. बाबुराव शंकर सावंत

श्री. वसंतराव शंकर रोडे

श्री. शंकर दगडू चव्हाण

श्री. आनंदा मारुती नांगरे

श्री. विष्णू कृष्णा तेटमे

श्री. निवृत्ती बापुराव लोटळे

श्री. हिंदुराव बंडू मोहिते

श्री. बापुराव लक्ष्मण पाटील

श्री. राजाराम बापू कात्रे

## ◆ कर्मचारी प्रतिनिधी ◆

श्री. दिनकर शंकर सावंत

## ◆ अंतर्गत हिशेब तपासणीस ◆

श्री. जी. एस. आफळे (सर्टीफाईड ऑडीटर्स)

## ◆ कायद्याचे सल्लागार ◆

ॲड. श्री. अशोक केशव पोफळे (बी. ए. एल. एल. बी.)

## ◆ सल्लागार मंडळ ◆

श्री. बाजीराव बाबुराव डाकवे

श्री. रघुनाथ ज्ञानू डाकवे

श्री. चंद्रकांत सखाराम रामिष्टे

श्री. विठ्ठल गणपत चव्हाण

श्री. रामचंद्र केशव डाकवे

नवी मुंबई कार्यालय पत्ता:-

रु. नं. ६४९, एस. एस. २ ओ, सेक्टर नं. ७, कोपरखैराणे, नवी मुंबई, जि. ठाणे.

*बँकर्स : दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लिमिटेड*

*बँकर्स : दि पारसिक जनता सहकारी बँक लिमिटेड*

# दि वांगव्हॅली को-ऑप क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई-३

## ✻ सर्वसाधारण सभेची सूचना ✻

या सूचनेद्वारे संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते कि, संस्थेच्या सभासदांची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दि. २८ सप्टेंबर १९९७ रोजी सकाळी ९-०० वाजता मुंबई देशस्थ मराठा ज्ञाती धर्म संस्था, तिसरा मजला, श्री. रघुनाथ महाराज स्ट्रीट, मांडवी, कोळीवाडा, मुंबई ४०० ००३ येथे खाली नमूद केलेल्या कामासाठी होणार आहे. तेंव्हा सर्व सभासदांनी वेळेवर हजर रहावे ही विनंती.

## ✻ सभेपुढील कामकाज ✻

१) सभेच्या अध्यक्षांची निवड करणे.

२) दि. ११-८-१९९६ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून मंजूर करणे.

३) दि. ३१ मार्च १९९७ अखेर संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, नफा वाटणी व अंदाजपत्रकास मंजूरी देणे.

४) सन १९९५-१९९६ चा अंतर्गत हिशेब तपासनीसांकडून व सरकारी हिशेब तपासनीसाकडून आलेली प्रतिवृत्त सादर करणे.

५) सन १९९७-९८ सालाकरिता अंतर्गत हिशेब तपासनीसाची नेमणूक करणे व मानधन ठरवणे.

६) उपविधी पोटनियम दुरुस्तीबाबत.

७) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणारे इतर विषय.

मुंबई

दिनांक : २५-८-९७

संचालक मंडळाच्या आदेशानुसार
श्री. बाबुराव तुकाराम डाकवे
सचिव

## ✻ विशेष सूचना ✻

१) गणसंख्येच्या अभावी तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व त्यासभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) सभासदांना सोसायटीच्या कामकाजाबाबत वार्षिक सभेमध्ये काही माहिती विचारणे किंवा सूचना करावयाच्या असतील तर त्यांनी ठराव रुपाने सर्वसाधारण सभेच्या सात दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत आणून द्याव्यात.

३) सन १९९३-९४ सालचा शिल्लक लाभांश ३१-१२-१९९७ पर्यंत घेऊन जावे तदनंतर नियमानुसार सदर वर्षाचा लाभांश गंगाजळी वर्ग केला जाईल.

## ✻ नम्र निवेदन ✻

१) सभासदांनी आपले बदललेले पत्ते त्वरीत कळवावेत.

२) सभासदांच्या पासबुक व ओळखपत्रावर फोटो लावून देणारी ठेवण्यात येत आहेत. तेंव्हा सभासदांनी पासपोर्ट आकाराच्या दोन फोटो प्रती संस्थेच्या कार्यालयात आणून द्याव्यात.

३) संस्थेत सभासदांसाठी बचत ठेव खाते सुरू करण्यात आले आहे. तरी सर्व सभासदांनी संस्थेत आपले बचत खाते उघडावे.

४) सभासदांनी सक्तीची बचत ठेवीवरील व्याजाची पासबुकामध्ये नोंद करून घ्यावी.

# २२ वा वार्षिक अहवाल सन १९९६-९७..........

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

आपल्या संस्थेचा बावीसावा वार्षिक अहवाल दिनांक ३१-३-१९९७ अखेरचे नफा-तोटा पत्रक, ताळेबंद पत्रक आपणास मंजूरीसाठी सादर करताना कार्यकारी मंडळास अत्यानंद होत आहे. अहवाल सालात संस्थेने अनेक अडचणीवर मात करून मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. कडून कर्ज न घेता स्वनिधीतून सभासदांना नियमीत कर्ज वितरण व ठेवीची रक्कम देय तारखेस परत केली आहे. म्हणून आपली संस्था विश्वासास पात्र ठरली आहे. अहवाल साली शासकीय हिशेब तपासणी झाली नसल्यामुळे शासकीय हिशेबनीसांच्या शेऱ्यास पात्र राहून ३१-३-१९९७ अखेरची नफा-तोटा पत्रक व ताळेबंदपत्रक सादर करत आहोत. संस्थेच्या प्रगतीची वाढ आपल्या सहकार्याने सतत चालू आहे.

## * सभासद :

३१ मार्च १९९६ अखेर सभासद संख्या ५१२३ होती, अहवाल साली मुख्य कार्यालयात ४०५ व वाशी कार्यालयात ८०, एकूण ४८५ नवीन सभासद झाले असून ४९ सभासद निवृत्त झाल्याने ३१ मार्च १९९७ अखेर सभासद संख्या ५५५९ आहे.

## * भाग भांडवल :

वर्षारंभी वसूल भागाची रक्कम रुपये ४०,३०,९००/- जमा होती.अहवाल साली मुख्य कार्यालय रुपये ६,२३,०५०/-, वाशी कार्यालय रुपये ५८,८७०/-, एकूण रुपये ६,८१,९२०/- भाग रुपाने जमा झाले. रुपये ६४,५२०/- भाग रक्कम परत केली. वर्षाअखेर वसूल भाग भांडवलाची रक्कम रुपये ४६,४८,३००/- जमा झाली आहे.

## * राखीव व इतर निधी :

संस्थेच्या राखीव (गंगाजळी) निधीत चालू वर्षात २,००,१४०-७५ची वाढ होऊन वर्षा अखेरीस एकूण जमा रक्कम रुपये १६,१३,५७४-५० झाली आहे. याशिवाय संशयित व बुडीत कर्ज निधी, इमारत निधी, लाभांश समीकरण निधी, रजत जयंती निधी, सभासद सहाय्य निधी यामध्ये भरघोस वाढ झालेली आहे. सन ३१ मार्च १९९७ अखेर एकूण सर्व निधी रुपये ३९,७०,१०९-५० झाला असून संस्था स्वनिधी वाढीसाठी सतत प्रयत्नशील आहे.

## * ठेवी :

संस्थेच्या सभासदांसाठी बचत ठेवी, दामदुप्पट ठेव योजना, मासिक संचित ठेव, सक्तीची बचत ठेव, दैनंदिन बचत ठेव, लखपती ठेव योजना सुरू केल्या असून सभासदांना संस्थेत ठेवी जमा करण्याची कार्यकारी मंडळाची विनंती आहे. वर्षअखेर आपल्या ठेवी रुपये ९३,४७,३४९/- जमा आहेत. अहवाल वर्षात ठेवीमध्ये जमा/नावे व शिल्लक रकमेचा पुढील तक्ता संस्थेच्या उन्नतीचा आलेख स्पष्ट दाखवत आहे.

| तपशील | आरंभी | जमा | नांवे | शिल्लक |
|---|---|---|---|---|
| बचत ठेव | २,५२,७८६ | ७,६२,६८३ | ७,६२,१४७ | २,५३,३२२ |
| मुदत ठेव | ३४,६३,०३१ | ११,१९,२५४ | ९,९०,४५२ | ३५,९१,८३३ |
| मासिक संचित ठेव | १,९८,१०३ | १,३५,०५० | १,२०,७०२ | २,१२,४५१ |
| सक्तीची बचत ठेव | ३४,२५,६९३ | ८,४४,५२९ | ४५,२८४ | ४२,२४,९३८ |
| दैनंदिन ठेव | ७,०५,११४ | २०,६९,६८९ | १७,५२,२६२ | १०,२२,५४१ |
| लखपती ठेव | -- | ४२,२६४ | -- | ४२,२६४ |
| एकूण | ८०,४४,७२७ | ४९,७३,४६९ | ३६,७०,८४७ | ९३,४७,३४९ |

गुंतवणूक : १) संस्थेने दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मध्ये भाग रुपाने रुपये १,३२,५००/- गुंतवणूक केली आहे.

२) संस्थेने दि मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. मध्ये ठेव रुपाने रुपये २९,००,०००/- एवढी गुंतवणूक केली आहे.

## कर्ज :

### * दिर्घ मुदत कर्ज :

वर्षारंभी रुपये १,३६,६३,८९६/- ची कर्जे येणे बाकी होती. अहवाल सालात मुख्य कार्यालय १०७९, वाशी कार्यालय ८७ एकूण ११६६ सभासदांना निरनिराळ्या कामाकरिता रुपये ८३,०५,०००/- ची नवीन कर्जे देण्यात आली. अहवाल साली रुपये ६५,०२,५३५/- कर्ज वसूल झाले ३१ मार्च १९९७ अखेर रुपये १,५४,६६,३६१/- चे कर्ज येणे बाकी आहे.

### * तातडीचे कर्ज :

वर्षारंभी रुपये २,३८,६००/- शिल्लक होते. संस्थेने अहवाल सालात सभासदांना जमा ठेव गहाण पोटी २,१४,४५०/- तातडीचे कर्ज वाटप केले असून रुपये २,८९,७५०/- वसूल झाले आहे. वर्ष अखेर रुपये १,६३,३००/- चे कर्ज येणे बाकी आहे.

### * थकबाकी :

वर्षाअखेर कर्ज थकबाकीचे प्रमाण वाढते आहे ही खेदाची बाब असून कर्ज थकबाकीमुळे संस्थेच्या प्रगतीस बाधा, ऑडीट वर्ग, कर्ज उभारण्याची क्षमता व कर्ज वाटपाची क्षमता यावर अनिष्ट परिणाम होऊ शकतो. कर्ज हप्ते थकविल्यास दंड व्याज, नोटीस फी व मानहानी सहन करावी लागते. त्यानंतरही कर्ज हप्ते न भरल्यास सहकार न्यायालयात दावा दाखल करून कर्ज वसूल केले जाते.

### * नफा :

अहवाल सालात संस्थेस रुपये ६,९४,१५५-३४ नफा झाला असून मागील वर्षी शिल्लक नफा रुपये ९२-०६ मिळून एकूण रुपये ६,९४,२४७-४० नफा विभाजनासाठी उपलब्ध आहे. कार्यकारी मंडळाने खालील नफा विगतवारी पत्रकानुसार नफा विभाजन व्हावे अशी शिफारस केली आहे.

## ३१ मार्च, १९९७ अखेर नफ्याची विगतवारी पत्रक

| तपशील | रुपये पैसे | तपशील | रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मागील वर्षी शिल्लक नफा | ९२-०६ | गंगाजळी निधी २५% प्रमाणे | १,७३,५६१-८५ |
| अहवाल सालात निव्वळ नफा | ६,९४,१५५-३४ | रजत जयंती निधी | १९,१००-०० |
| | | लाभांश वाटप १२% प्रमाणे | ५,०१,५१४-६० |
| | | शिल्लक नफा | ७०-९५ |
| एकूण | ६,९४,२४७-४० | एकूण | ६,९४,२४७-४० |

### * कार्यकारी मंडळ :

कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांची निर्मळ स्वयंमपूर्ती सेवा संस्थेस लाभत आलेली आहे. पदाधिकारी व सदस्यांनी आपला बहुमूल्य वेळ संस्थेच्या कामकाजास सतत दिला आहे. कार्यकारी मंडळाच्या एकूण १५ सभा झाल्या असून सर्व सदस्यांनी वेळेवर उपस्थित राहून एकमताने कामकाज पाहिले आहे.

### * दैनंदिन ठेव प्रतिनिधी :

सन १९९६-९७ अहवाल सालात संस्थेस दैनंदिन ठेव योजनेस सदस्यांकडून चांगला प्रतिसाद मिळाला असून त्याचे श्रेय प्रामुख्याने प्रतिनिधी सौ. वंदना श्रीकृष्ण ढोबळे, श्री. तानाजी बापूराव चव्हाण, श्री. शामराव शंकर सावंत, श्री. माणिक शंकर नांगरे व श्री. सुनिल श्रीरंग कोळेकर यांना आहे. त्यांनी दैनंदिन ठेव व रक्कम वाढवलीच शिवाय ठेवीदारांमध्ये संस्थेबाबत विश्वास व लौकिक वाढविला आहे. त्यांची संस्था आभारी आहे. त्याचप्रमाणे कर्ज वसूली प्रतिनिधी श्री. उत्तम विठ्ठल राजे यांनी कर्ज वसुलीसाठी व्यक्तीशः सभासदांच्या भेटी घेऊन कर्ज वसूलीचे अति उत्कृष्ट कार्य केले आहे. त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

## • श्रद्धांजली •

*कामगार नेते डॉ. दत्ता सामंत, थोर स्वातंत्र्य सेनानी- अरुणा असफअली, साहित्यीक दया पवार, भाऊ पाध्ये, भारताचे माजी राष्ट्रपती निलम संजीव रेड्डी, संगीतकार राम कदम, नाट्य कलावंत चंदू पारखी व संस्थेचे सभासद, कै. लहुराज शेलार, कै. चंद्रकांत सखाराम रोडे, कै. नारायण बहिणाजी सावंत, कै. दाजी राजाराम कदम यांना काळाने आपल्या पासून हिरावले आहे. त्यांच्या मृत आत्म्यास सद्‌गती व चिरशांती लाभो अशी सर्व सभासद व संचालक मंडळाच्या वतीने ईश्वर चरणी प्रार्थना.....*

# ✻ आभार ✻

संस्थेचे सर्व भागधारक, ठेवीदार, हितचिंतक व सहकारी या सर्वांची संस्था आभारी आहे. सहकार खात्याचे विभागीय सहनिबंधक मा. श्री. सुधीरजी ठाकरे, सहाय्यक निबंधक मा. श्री. आर. व्ही. पाटील, बी. वार्ड, मुंबई यांनी दिलेल्या सहकार्याबद्दल संस्था आभारी आहे.

को-ऑप. बँक एम्प्लॉईज युनियन व बृहन्मुंबई को-ऑप. सोसायटी एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष मा. खासदार श्री. आनंदरावजी अडसूळ साहेब यांच्या सहकार्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेच्या सर्व कर्मचाऱ्यांनी संस्थेचे कामकाज योग्य रितीने सांभाळल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. तसेच श्री. शंकरराव गणपती डाकवे यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शनाबद्दल संस्था त्यांची आभारी आहे. संस्थेचे अंतर्गत हिशोब तपासणीस श्री. जी. एस. आफळे (सर्टिफाईड ऑडीटर) यांनी हिशेब व इतर दप्तर वेळोवेळी तपासून महत्वपूर्ण सल्ला दिल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

दि मुंबई जिल्हा मध्य. सह. बँक व दि पारसिक जनता सह. बँक लि. चे संचालक, अधिकारी वर्ग यांनी केलेले मार्गदर्शन व सहकार्य याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

संस्थेचे कार्य प्रगतीपथावर राखण्यासाठी व एकमताने संस्थेचे कामकाज केल्याबद्दल सर्व संचालक सदस्यांची संस्था आभारी आहे.

ज्ञात व अज्ञात व्यक्तींनी केलेल्या सहकार्याबद्दल आभार मानून व सहकार्याची दृढ आशा व्यक्त करून आपल्यासमोर ठेवलेला अहवाल, हिशोबपत्रके स्विकृत करून झालेली सेवा मान्य करून घ्याल अशी अपेक्षा करतो.

*जय हिन्द !* *जय महाराष्ट्र !* *जय सहकार !*

आपला सहकारी,

**श्री. आत्माराम निवृत्ती थोरात**
अध्यक्ष

# ◆ सभासदांना सूचना ◆

१) सभासदांना सभासद होऊन सहा महिने झाल्याशिवाय कर्जाचा अर्ज करता येणार नाही.

२) प्रथम कर्ज रुपये ५,०००/- मंजूर करण्यात येईल त्याची योग्य रितीने परतफेड झाल्यानंतरचे दुसरे कर्ज रुपये १०,०००/- व १५,०००/- क्रमवाढीने मंजूर केले जाईल.

३) रुपये २,०००/- कर्जासाठी रुपये ४००/- शेअर्स व रुपये ५,०००/- व रुपये १०,०००/- कर्जासाठी रुपये १,०००/- शेअर्स असला पाहिजे. तसेच कर्ज रुपये १५,०००/- साठी रुपये १,५००/- शेअर्स असला पाहिजे. शेअर्स जामिनदारांसह पूर्ण असावा.

४) सभासदांनी कर्जासाठी अर्ज प्रत्येक महिन्याच्या १० ते २५ तारखेपर्यंत करावेत. अर्ज जामीनदारांच्या सह्या व शेअर्ससह २५ तारखेपर्यंत पूर्ण झाला पाहिजे.

५) सभासदांनी जामीनकीच्या जबाबदारीची चौकशी केल्याशिवाय अर्ज करू नये. तसेच सभासदांनी दोन पेक्षा अधिक कर्जदारांना सह्या करू नयेत.

६) सभासदांनी रुपये १०,०००/- व रुपये १५,०००/- कर्जाच्या अर्जासाठी रेशनिंग कार्ड झेरॉक्स सोबत सत्यप्रत घेऊन यावी व उत्पन्नाचा दाखला मूळप्रत, लाईट बिल किंवा खोलीची भाडे पावती अर्जासोबत पूर्तता करावी लागेल.

७) सभासदांनी संस्थेच्या कामासाठी येताना पासबुक जवळ असणे आवश्यक आहे. पासबुका शिवाय सभासदांचे कामकाज केले जाणार नाही.

८) कर्जाचे अर्जास महिन्याच्या पहिल्या येणाऱ्या रविवारी संचालक मंडळाच्या मासिक सभेमध्ये मंजूरी देण्यात येईल व कर्ज मंजूर झाल्यानंतर संस्थेच्या नियमानुसार सक्तीची बचत व मुदत ठेवीची रक्कम रोख घेण्यात येईल व मंजूर कर्ज चेकनुसार देण्यात येईल.

९) ज्या सभासदांच्या कर्जास कर्जदार जामीन आहेत व जे सभासद कर्जदारास जामीन राहू इच्छितात अशा सभासदांकडून थकीत कर्ज वसूल झाल्यानंतर कर्ज दिले जाईल.

१०) आपण ज्या कर्जदारास जामीन आहात तो कर्जदार नियमीत कर्ज परतफेड करतो किंवा नाही याची खात्री करून घ्या.

११) संस्थेच्या उन्नतेसाठी संस्थेत भरघोस ठेवी जमा करा.

१२) संस्थेच्या कामकाजाची वेळ : सकाळी ८-३० ते ११-३० आणि
सोमवार ते शनिवार : सायंकाळी ४-०० ते ६-०० पर्यंत राहील.

# ✻ अंतर्गत हिशेब तपासणीसाचे प्रमाणपत्र ✻

आम्ही दि वांगव्हॅली को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि., मांडवी कोळीवाडा, ढोबळे बिल्डींग, २६-२७ जंजीकर स्ट्रीट, मुंबई ४०० ००३ या संस्थेचे दिनांक ३१-३-१९९७ अखेरचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक, सोसायटीच्या हिशेबांच पुस्तके, खर्च पावत्या आणि इतर सादर केलेली कागदपत्रे, रजिस्टर्स इत्यादि तपासून पाहिली. संस्था सर्वसाधारण शेऱ्यास पात्र राहून, मी निवेदन करतो कि,

१) आमच्या हिशेब तपासणीसाठी लागणारी आवश्यक ती माहिती व खुलासे आमच्या समजुतीप्रमाणे पुरवण्यात आली.

२) आमच्या मते सहकारी सोसायटीच्या कायद्याप्रमाणे व नियमानुसार सोसायटीचे दप्तर ठेवणेत आले आहे.

३) सोसायटीचा ताळेबंद व नफा-तोटा पत्रक सोसायटीच्या हिशेबांच्या पुस्तकाप्रमाणे जुळत आहेत.

४) आमचे व आम्हाला दिलेल्या माहितीनुसार आमची खात्री झाल्यावरून महाराष्ट्र को-ऑप. सोसायटी ॲक्ट १९६० व कानूननुसार सदर सोसायटीची पत्रके योग्य आर्थिक परिस्थिती खालीलप्रमाणे दर्शवित आहेत.

अ) दिनांक ३१-३-९७ अखेरचा सोसायटीचा ताळेबंद पत्रकाप्रमाणे सोसायटीचे व्यवहार

ब) दिनांक ३१-३-९७ अखेरचा नफा-तोटा पत्रक (१९९६-९७ चे) प्रमाणे सोसायटीस झालेला निव्वळ नफा हे आमचे स्वतंत्र जोडलेल्या शेऱ्यास अनुसरून बरोबर आहेत.

सही/-

मुंबई
दिनांक

(गो. शं. आफळे)
अंतर्गत हिशेब तपासनीस

## २२ वर्षांची प्रगतीची वाटचाल

| अहवाल वर्ष | सभासद | भाग भांडवल | निधी | ठेवी | खेळते भांडवल | गुंतवणूक | कर्जवाटप | नफा | लाभांश | तपासणी वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १९७५-७६ | २६६ | १५९९० | २९८ | -- | १७१०० | १०० | १४५५० | १२९ | - | अ |
| १९७६-७७ | ३६२ | २४४८० | ३६२ | - | २७८५५ | १०० | २५९५० | २८९४ | ७% | अ |
| १९७७-७८ | ४५२ | ४६३४० | १३९२ | - | ६१२८५ | १००० | ५८१०० | ३९२५ | ६% | अ |
| १९७८-७९ | ५२७ | ७०८७० | २७१८ | - | १०४७३९ | ३००० | ९५६०० | ९५१३ | ६% | अ |
| १९७९-८० | ६९९ | ११२१९० | ८१४२ | - | २०४६३६ | ८५०० | १९२०५० | ११५९५ | ६% | अ |
| १९८०-८१ | ८७६ | १७६०१० | १३०८६ | - | ३२३०१३ | १२५०० | ३०२२५० | १९५९८ | ६% | अ |
| १९८१-८२ | ११०५ | २७०४३० | २२१६२ | - | ५४१७८० | २०५०० | ५११७०० | २९९३७ | ७% | अ |
| १९८२-८३ | १३४२ | ३६६२९० | ३३१३८ | - | ७०६५७७ | ३०५०० | ६६४६५० | २९६४८ | ६% | ब |
| १९८३-८४ | १६२४ | ५३९२७० | ४४७९० | ७५०० | १०३८७८३ | ३५५०० | ९८५२५० | ८१६४१ | ८% | अ |
| १९८४-८५ | १७८० | ६६७७४० | ८३९७८ | ७७३८३ | ११६६१०० | ४०००० | १२९६५५० | १०६१२८ | ९% | अ |
| १९८५-८६ | १९९८ | ८४२२४० | १३७४१० | १६२४२६ | १८४१६८३ | ५०००० | १६६५७५० | १४७१७८ | ९% | अ |
| १९८६-८७ | २२४७ | १००६६३० | २५४८६१ | २२९६३० | २५३४९७६ | ३२५५०० | २०९५००० | १४५११६७ | १०% | अ |
| १९८७-८८ | २६८२ | १३५८०७० | ३५३४१० | ८१२२४५ | ४१२६७०४ | ७०७५०० | ३३२३१७५ | २३४७७० | १२% | अ |
| १९८८-८९ | ३०९० | १७१२६८० | ५८६६७६ | १४५४११५ | ५११५६८१० | ७०७५०० | ४३७५८४० | ३५९३३६ | १२% | अ |
| १९८९-९० | ३३६९ | २०५३५६० | ९३८४८२ | २०१९६७५ | ७४३०३९८ | १३४७५०० | ५९४१६२० | ४८५९१३ | १२% | अ |
| १९९०-९१ | ३४७३ | २३४१६६० | १३०२०६३ | २८४१७२४ | ९८२६२२५ | २०४८५०० | ७५४६७०० | ५३११२७ | १२% | अ |
| १९९१-९२ | ३८२८ | २६२७४७० | १७२०१७६ | ३३७६६१३ | ११२४०७७० | २४९८५०० | ८३६८३५५ | ५७१३२७ | १२% | अ |
| १९९२-९३ | ३९५० | २७६३८२० | २१८६८५३ | ४०२१७०८ | ११५१०२१६ | १९९८५०० | ८६१५५६० | ४२४५०६ | १२% | अ |
| १९९३-९४ | ४२४५ | ३०५९३६० | २७५२०८६ | ४७५१२५० | १२४१९७३० | १९९८५०० | १००६४६४५ | ६३०९३१ | १२% | अ |
| १९९४-९५ | ४५९३ | ३४५५०२० | ३१८५४६६ | ५५३५४७२ | १४४४५८९५ | २३४८५०० | ११५७७९११ | ६४५५१५ | १२% | अ |
| १९९५-९६ | ५१२३ | ४०३०९०० | ३६१०२४५ | ८०४४७२७ | १६९५६०२८ | २५४८५०० | १३९०२४९६ | ६५९६०२ | १२% | अ |
| १९९६-९७ | ५५५१ | ४६४८३०० | ३९७०१०९ | ९३४७३४९ | १९४८६६८२ | ३०३३५०० | १५७५३०११ | ६९४२४७ | १२% | - |

* कार्यकारी मंडळाच्या शिफारसीनुसार

३१ मार्च १९९७ अखेर

| १९९५-९६ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| ८,६१,३१८-९१ | ठेवी व कर्जावरील व्याज | | |
| | मुदत ठेवीवरील व्याज | ४,२२,२१९-०२ | |
| | सक्तीची बचत ठेवीवरील व्याज | ४,२७,९०४-६० | |
| | मासिक संचित ठेवीवरील व्याज | २४,१६१-१० | |
| | दैनंदिन बचत ठेवीवरील व्याज | ७४,०२२-७० | |
| | बचत ठेवीवरील व्याज | १५,७५१-७० | |
| | सुरक्षित ठेवीवरील व्याज | २,२६४-७० | |
| | बँक व्याज | ४,२०४-०० | |
| | कर्मचारी प्रॉ. फंडावरील व्याज | १६,६६३-९० | |
| | लखपती ठेव योजनेवरील व्याज | २,२६४-३१ | ९,८९,४५६-०३ |
| २,७५,१३९-९५ | पगार व बोनस | | |
| | पगार | ३,८९,४२८-६५ | |
| | बोनस | ४५,७१६-९० | ४,३५,१४५-५५ |
| १३,३३२-८५ | सेवक वर्ग भविष्य निधी अंशदान | | ३१,२८२-७५ |
| ४८,६८२-७५ | ऑफीस भाडे वीज व विमा खर्च | | |
| | १) ऑफीस भाडे | १५,७५०-०० | |
| | २) विमा वर्गणी | १,९२८-०० | |
| | ३) ऑफिस खर्च | २४,५८३-९५ | ४२,२६१-९५ |
| ६,५४८-२५ | प्रवास खर्च | | ३,५३९-५० |
| १६,५००-०० | सल्लागार फी व लवाद खर्च | | ४२,९६०-०० |
| १२,२१,५२२-७१ | बेरीज पुढील पानावर | | १५,४४,६४५-७८ |

## नफा-तोटा पत्रक

| १९९५-९६ रुपये पैसे | उत्पन्न | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| २२,१२,६३३-१२ | व्याज | | |
| | सरळ व्याज | २१,६५,१४७-६५ | |
| | दंड व्याज | १,७३,१३२-८७ | |
| | गुंतवणुकीवर मिळालेले व्याज | ३,१५,१४४-०० | २६,५३,४२४-५२ |
| ४७,८९९-२८ | इतर जमा | | |
| | भागावरील लाभांश | १५,९००-०० | |
| | पासबुक व इतर जमा | ३८,५०५-२५ | ५४,४०५-२५ |
| २२,६०,५३२-४० | बेरीज पुढील पानावर | | २७,०७,८२९-७७ |

# दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई-३

## ३१ मार्च १९९७ अखेर

| १९९५-९६ रुपये पैसे | खर्च | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| १२,२१,५२२-७१ | मागील पानावरून | ~~१५,४४,६४५-७८~~ | १५,४४,६४५-७८ |
| ११,४८२-७५ | टपाल तार व दूरध्वनी खर्च | | |
| | टपाल व तार खर्च | १३,५०२-०० | |
| | दूरध्वनी खर्च | ६,५३५-७५ | २०,०३७-७५ |
| २२,२२३-०० | हिशेब तपासणीस फी | | २५,०००-०० |
| ८,१४०-९५ | कायम सामानावरील घसारा | | ७,९२१-८० |
| ५८,५९९-७५ | छपाई लेखनसामुग्री व जाहिरात | | |
| | छपाई व लेखन सामुग्री | १,२२,९६९-३५ | |
| | जाहीरात व देणगी | २,६५३-०० | १,२५,६२२-३५ |
| १,६०,६८६-८० | इतर खर्च | | |
| | बँक चार्जेस | २९-०० | |
| | कमिशन खर्च | ८३,३२७-३० | |
| | किरकोळ खर्च | ३६,७३७-७५ | |
| | वार्षिक सभा खर्च | ८,७३७-०० | |
| | कर्मचारी प्रवास भत्ता | ५,४००-०० | |
| | कर्मचारी वैद्यकीय भत्ता | ८,०००-०० | १,४२,२३१-०५ |
| -- | पदाधिकारी मानधन | ३०,०००-०० | |
| -- | मासिक मिटींग भत्ता | ६,१५०-०० | |
| -- | कार्यकारणी भत्ता | ६,८००-०० | ४२,९५०-०० |
| १,१८,५८५-५० | म. स. संस्था अधिनियम १९६० तरतुदी | | |
| | सहकार शिक्षण निधी | ५,०००-०० | |
| | कर्मचारी सेवानिवृत्ती निधी | २०,२६५-७० | २५,२६५-७० |
| | बुडीत व संशयित कर्जनिधी | ८०,०००-०० | ८०,०००-०० |
| ६,५९,२९०-९४ | निव्वळ नफा (ताळेबंदपत्रक जमा) | | ६,९४,१५५-३४ |
| २२,६०,५३२-४० | एकूण | | २७,०७,८२९-७७ |

**गो. शं. आफळे**
अंतर्गत हिशेब तपासनीस

## नफा-तोटा पत्रक

| १९९५-९६ रुपये पैसे | उत्पन्न | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|
| २२,६०,५३२-४० | मागील पानावरून | | २७,०७,८२९-७७ |
| २२,६०,५३२-४० | एकूण | | २७,०७,८२९-७७ |

| | | |
|---|---|---|
| श्री. जयसिंग यशवंत वोत्रे | श्री. बाबुराव तुकाराम डाकवे | श्री. आत्माराम निवृत्ती थोरात |
| खजिनदार | सचिव | अध्यक्ष |

## ३१ मार्च १९९७ अखेर संपणाऱ्या

| १९९५-९६ रुपये पैसे | भाग भांडवल व जबाबदाऱ्या | रुपये पैसे | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| ४५,००,०००-०० | अधिकृत भाग भांडवल | | | ४५,००,०००-०० |
| ४०,३०,९००-०० | वसूल भाग भांडवल | | | |
| | मागील वर्षी ताळेबंदानुसार | | | |
| | प्र.१०/- रु. प्रमाणे ४०३०९० भाग | ४०,३०,९००-०० | | |
| | अधिक : अहवाल सालात वसूल | ६,८१,९२०-०० | ४७,१२,८२०-०० | |
| | वजा : अहवाल सालात परत | | ६४,५२०-०० | ४६,४८,३००-०० |
| १४,१३,४३३-७५ | राखीव निधी | | | |
| | गंगाजळ निधी | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | १४,१३,४३३-७५ | | |
| | अधिक : मागील वर्षाच्या नफ्यातून | १,६४,९००-५५ | | |
| | अधिक : सन ९२-९३ चा लाभांश | ३४,४६५-२० | | |
| | अधिक : सन ९६-९७ ची प्रवेश फी | ७७५-०० | १६,१३,५७४-५० | |
| ५,७९,०११-०० | इमारत निधी | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | ५,७९,०११-०० | | |
| | अधिक : मागील वर्षाच्या नफ्यातून | ५,९८९-०० | | |
| | अधिक : अहवाल सालात जमा | २४,७३५-०० | ६,०९,७३५-०० | |
| १०,९८,२५०-०० | बुडीत व संशयित कर्ज निधी | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | १०,९८,२५०-०० | | |
| | अधिक:अहवाल सालात नफ्यातून वर्ग | ८०,०००-०० | ११,७८,२५०-०० | |
| १,६४,५५०-०० | लाभांश समीकरण निधी | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | | १,६४,५५०-०० | |
| १,७५,०००-०० | रजत जयंती निधी | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | १,७५,०००-०० | | |
| | मागील वर्षाच्या नफ्यातून | ४९,०००-०० | २,२४,०००-०० | |
| १,८०,०००-०० | सभासद सहाय्य निधी | | | |
| | मागील वर्षाच्या ताळेबंदानुसार | | १,८०,०००-०० | ३९,७०,१०९-५० |
| ८०,४४,७२७-२८ | ठेवी | | | |
| | बचत ठेव | | २,५३,३२२-८७ | |
| | मुदत ठेव | | ३५,९१,८३३-५३ | |
| | सक्तीची बचत ठेव | | ४२,२४,९३७-१५ | |
| | मासिक संचित बचत ठेव | | २,१२,४५०-७० | |
| | दैनंदिन बचत ठेव | | १०,२२,५४१-०० | |
| | लखपती ठेव | | ४२,२६४-३१ | ९३,४७,३४९-५६ |
| १,५६,८५,८७२-०३ | बेरीज पुढील पानावर | | | १,७९,६५,७५९-०६ |

## वर्षाचे ताळेबंद पत्रक

| १९९५-९६ रुपये पैसे | मालमत्ता व येणे | रुपये पैसे | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| २,६३,१५९-१४ | **रोख व बँक शिल्लक** | | | |
| | हाती असलेली रोख शिल्लक | | ३५,७२१-०२ | |
| | मुंबई बँक लि. चालू खाते | | २१,०९४-०५ | |
| | मुंबई बँक लि. ओव्हरड्राफ्ट खाते | | २,९७,६३८-०४ | |
| | दि पारसिक जनता सह. बँक लि. | | ३९,४०५-१० | ३,९३,८५८-२१ |
| २५,४८,५००-०० | **गुंतवणूक** | | | |
| | मुंबई ना.स.पत.संस्था संघ मर्या.भा. | | १,०००-०० | |
| | मुंबई जिल्हा म. सह. बँक लि. भाग | | १,३२,५००-०० | |
| | मुंबई जि. म. सह. बँक लि. मध्ये ठेव | | २९,००,०००-०० | ३०,३३,५००-०० |
| | **कर्ज व येणी** | | | |
| १,३६,६३,८९६-०० | **जामिनकी दिर्घ मुदत कर्ज** | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | १,३६,६३,८९६-०० | | |
| | अधिक : अहवाल सालात वाटप | ८३,०५,०००-०० | | |
| | एकूण | २,१९,६८,८९६-०० | | |
| | वजा : अहवाल सालात वसूल | ६५,०२,५३५-०० | १,५४,६६,३६१-०० | |
| २,३८,६००-०० | **तातडीचे अल्पमुदत कर्ज** | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | २,३८,६००-०० | | |
| | अधिक : अहवाल सालात वाटप | २,१४,४५०-०० | | |
| | एकूण | ४,५३,०५०-०० | | |
| | वजा : अहवाल सालात वसूल | २,८९,७५०-०० | १,६३,३००-०० | |
| -- | **कर्मचारी कर्ज** | | | |
| | अहवाल सालात वाटप | १,६९,०००-०० | | |
| | वजा : अहवाल सालात वसूल | ४५,६५०-०० | १,२३,३५०-०० | १,५७,५३,०११-०० |
| ५७,५३२-०० | **येणे व्याज** | | | |
| | मुंबई बँक लि. कडून ठेवीवरील व्याज | | | ८९,७५३-०० |
| ६१,०२२-८० | **कायम सामान व मालमत्ता** | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | ६१,०२२-८० | | |
| | अधिक : अहवाल सालातील खरेदी | ४,२००-०० | ६५,२२२-८० | |
| | वजा : अहवाल सालात घसारा | | ७,९२१-८० | ५७,३०१-०० |
| १,२३,३१८-६० | **इतर जिंदगी व येणी** | | | |
| | दूरध्वनी | ८,०००-०० | | |
| | वीज पुरवठा व डिपॉझीट | १,७७०-०० | | |
| | ऑफीस डिपॉझीट | ८०,०००-०० | ८९,७७०-०० | |
| १,६९,५६,०२८-५४ | बेरीज पुढील पानावर | | | १,९३,२७,४२३-२१ |

# दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई-३

## ३१ मार्च १९९७ अखेर संपणाऱ्या

| १९९५-९६ रुपये पैसे | भाग भांडवल व जबाबदाऱ्या | रुपये पैसे | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १,५६,८५,८७२-०३ | मागील पानावरून पुढे | | | १,७९,६५,७५९-०६ |
| १,२८,१८४-१० | व्याज देणी | | | |
| | मासिक संचित बचत ठेवीवरील व्याज | | ४८,४५५-५५ | |
| | दैनंदिन बचत ठेव वरील व्याज | | १,०६,७२४-५० | १,५५,१८०-०५ |
| ४,८२,३७०-२५ | इतर येणी | | | |
| | विमा वर्गणी | | २३०-०० | |
| | सेवा निवृत्ती निधी (ग्रॅज्युईटी) | | ५५,८६९-७० | |
| | छपाई व लेखन सामुग्री | | २३,८४८-४० | |
| | मागणी न केलेला लाभांश | | ३,१४,१७२-२० | |
| | ऑडीट फी देणे | | २५,५२२-०० | |
| | सहकार शिक्षण निधी | | ५,०००-०० | |
| | अनामत ठेव | | २,७४२-०५ | |
| | सुरक्षित ठेव | | २७,५५४-४० | |
| | कर्मचारी भविष्य निधी | | १,२८,३२३-६० | |
| | व्यवसाय कर | | ७१०-०० | |
| | ऑफीस भाडे | | ६,८५०-०० | |
| | इतर देणी | | ३३,९५३-५० | |
| | मेहनताना | | ४,०६६-०० | |
| | बोनस | | ४२,४५४-१५ | |
| | प्रवास | | २००-०० | ६,७१,४९६-०० |
| ६,५९,६०२-१६ | नफा | | | |
| | मागील ताळेबंदाप्रमाणे | | ६,५९,६०२-१६ | |
| | वजा : २५% प्रमाणे गंगाजळ निधी | १,६४,९००-५५ | | |
| | इमारत निधी | ५,९८९-०० | | |
| | भागावरील १२% प्रमाणे लाभांश | ४,३९,६२०-५५ | | |
| | रजत जयंती निधी | ४९,०००-०० | ६,५९,५१०-१० | |
| | पुढील वर्षी घेण्यासाठी | | ९२-०६ | |
| | अधिक अहवाल सालातील नफा | | ६,९४,१५५-३४ | ६,९४,२४७-४० |
| १,६९,५६,०२८-५४ | एकूण | | | १,९४,८६,६८२-५ |

**गो. शं. आफळे**
अंतर्गत हिशेब तपासनीस

## वर्षाचे ताळेबंद पत्रक

| १९९५-९६ रुपये पैसे | मालमत्ता व येणे | रुपये पैसे | रुपये पैसे | १९९६-९७ रुपये पैसे |
|---|---|---|---|---|
| १,६९,५६,०२८-५४ | मागील पानावरून पुढे | | | १,९३,२७,४२३-२१ |
| | स्टेशनरी शिल्लक | | ६७,८९१-३० | |
| | आर्देशिव स्टॅम्प | | १,५९०-०० | १,५९,२५९-३० |
| १,६९,५६,०२८-५४ | एकूण | | | १,९४,८६,६८२-५१ |

श्री. जयसिंग यशवंत बोत्रे — खजिनदार

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे — सचिव

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात — अध्यक्ष

## १९९७-९८ चे अंदाज - पत्रक

| खर्चाचा तपशील | १९९६-९७ अंदाजे खर्च | १९९६-९७ खर्च | १९९७-९८ अंदाजे खर्च | उत्पन्नाचा तपशील | १९९६-९७ अंदाजे उत्पन्न | १९९६-९७ उत्पन्न | १९९७-९८ अंदाजे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ठेवी व कर्जावरील व्याज | १०,७६,६५० | ९,८९,४५६ | ११,३७,८७५ | व्याज जमा | २५,८०,०५० | २६,५३,४२४ | २९,९८,३७० |
| पगार व बोनस | ३,४०,००० | ४,६६,४२८ | ५,३६,३९२ | इतर जमा | ५०,१०० | ५४,४०५ | ६२,१६५ |
| भाडे वीजपुरवठा विमा | ५५,००० | ४२,२६२ | ४८,६०१ | | | | |
| लवाद खर्च | २०,००० | ४२,९६० | ४९,४०४ | | | | |
| तार, टपाल व दूरध्वनी | १५,००० | २०,०३८ | २३,०४२ | | | | |
| ऑडीट फी | ३०,००० | २५,००० | २८,७५० | | | | |
| कायम सामानावरील घसारा | ८,००० | ७,९२२ | ९,१०९ | | | | |
| छपाई व स्टेशनरी जाहिरात | ८०,००० | १,२५,६२२ | १,४४,४६५ | | | | |
| इतर खर्च | १,८०,००० | १,८८,७२१ | १,६३,५६५ | | | | |
| म. स. संस्था अधि. १९६० चे कलम ६५ अन्वये तरतुदी | १,२०,००० | १,०५,२६५ | १,२१,०५४ | | | | |
| निव्वळ | ७,०५,५०० | ६,९४,१५५ | ७,९८,२७८ | | | | |
| एकूण | २६,३०,१५० | २७,०७,८२९ | ३०,६०,५३५ | एकूण | २६,३०,१५० | २७,०७,८२९ | ३०,६०,५३५ |

श्री. जयसिंग यशवंत बोत्रे
खजिनदार

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे
सचिव

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात
अध्यक्ष

## पोटनियम दुरुस्ती परिशिष्ट

| उपविधी कलम अ. क्र. | विद्यमान उपविधीची निश्चित शब्दयोजना | सुधारणा केल्यानंतर उपविधीचे स्वरुप | दुरुस्तीचे कारण |
|---|---|---|---|
| फ- कर्ज फ - १ - १ | सदस्यांना शे. १८% वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या अगर दोन सदस्यांच्या वैयक्तिक आणि (कोणताच बोजा नसलेल्या ऋणको सदस्यांचा स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. ह्या पोटनियमांच्या तरतुदीन्वये संस्थेचा सदस्य १५,०००/- रुपये पेक्षा अधिक रकमेचा संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. कर्ज रक्कम पाच वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता कर्जाऊ देता येणार नाही. जर कर्जाच्या रकमा रोखीने दिल्या तर व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहिजेत. | सदस्यांना शे. १८% वार्षिक व्याजाच्या दराने व्यवस्थापक समितीने मान्य केलेल्या अगर दोन सदस्यांच्या वैयक्तिक आणि (कोणताच बोजा नसलेल्या) ऋणको सदस्यांच्या स्थावर मिळकतीवर कर्ज देता येईल. ह्या पोटनियमाच्या तरतुदीन्वये संस्थेचा सदस्य ३०,०००/- रुपये पेक्षा अधिक रकमेचा संस्थेचा कर्जदार नसला पाहिजे. कर्ज रक्कम पाच वर्षापेक्षा अधिक मुदतीकरिता कर्जाऊ देता येणार नाही. जर कर्जाच्या रकमा रोखीने दिल्या तर व्यवस्थापक समितीच्या एका तरी सदस्याच्या उपस्थितीत दिल्या गेल्या पाहिजेत. | संस्थेच्या सदस्यांना लघुउद्योग, मुलांचे उच्च शिक्षण, लग्न समारंभ यासाठी वाढत्या गरजेनुसार कर्ज पुरवठा करण्यासाठी. |
| फ-१३ | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये ४५ लाख राहील. | संस्थेचे अधिकृत भागभांडवल रुपये १ कोटी राहील. | वसूल भाग भांडवलात भरघोस वाढ होत असून अधिकृत भागभांडवलाची मर्यादा संपुष्टात आली असल्याने अधिकृत भागभांडवलाची मर्यादा वाढविणे आवश्यक आहे. |

कार्यकारी मंडळाने उपरोक्त नमूद उपविधी पोटनियम दुरुस्ती सुचविली असून त्यास सर्वसाधारण सभेची मान्यता हवी आहे.

**श्री. जयसिंग यशवंत बोत्रे**
खजिनदार

**श्री. बाबुराव तुकाराम डाकवे**
सचिव

**श्री. आत्माराम निवृत्ती थोरात**
अध्यक्ष

# दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई-३

ढोबळे बिल्डींग, २६/२८, जंजीकर स्ट्रीट, मुंबई - ४०० ००३

आपल्या दि वांगव्हॅली को-ऑपरेटिव्ह क्रेडीट सोसायटी लि. ने १९९६ पासून लखपती ठेव योजना सुरू केली असून सदर योजनेचा लाभ सर्वांनी घ्यावा. ही योजना सर्वांच्यासाठी आहे. ती खालीलप्रमाणे

## वांगव्हॅली लखपती ठेव योजना १९९६

| अ. क्र. | गुंतवणूकीची रक्कम | मुदत वर्षे / महिने | मुदतीनंतर मिळणारी रक्कम |
|---|---|---|---|
| १ | ५,०००/- | २१ वर्षे | १,००,१००/- |
| २ | १०,०००/- | १६ वर्षे ३ महिने | १,००,५००/- |
| ३ | १५,०००/- | १३ वर्षे ३ महिने | १,००,५००/- |
| ४ | २०,०००/- | ११ वर्षे ३ महिने | १,००,५००/- |

या पूर्वीच्या दैनंदिन ठेव योजना, मासिक संचित बचत ठेव योजना आणि पुर्नगुंतवणूक ठेव योजना चालू आहेत. त्या योजना क्रमाने मुखपृष्ठाच्या शेवटच्या पानावर दिल्या आहेत. याही योजनांचा सर्वांनी लाभ घ्यावा.

आपले नम्र,

श्री. जयसिंग यशवंत बोत्रे
खजिनदार

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात
अध्यक्ष

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे
सचिव

**सर्व सभासदांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा !**

# दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई - ३

## दैनंदिन ठेव योजना व मासिक संचित ठेव योजना

पैशाला पैसा आकर्षित असतो या उक्तीनुसार सर्वसामान्य व्यक्तीस सुलभरित्या बचत क[illegible] साध्य होण्यासाठी संस्थेने दैनंदिन ठेव योजना व मासिक संचित ठेव योजना सुरू केल्या आहेत. आपली लहानशी बचत गु[illegible]कमी भरघोस रक्कम मिळवते. दैनंदिन योजनेत आपल्या कुवतीनुसार रु. १/- पासूनची रक्कम आणि मासिक संचित ठे[illegible] रु. १०/- अगर त्याचे पटीत रक्कम गुंतवून खालील तक्त्यात दाखविल्याप्रमाणे संचित फल पदरी पाडील.

### दैनंदिन ठेव योजना

| दररोज भरावयाची रक्कम | १ वर्ष | २ वर्ष | ३ वर्ष |
|---|---|---|---|
| १ | ३८०.७५ | ७९४.४५ | १२८२.४० |
| २ | ७६१.५० | १५८८.९० | २५६४.८० |
| ५ | १९०३.७५ | ३९७२.२५ | ६४१२.०० |
| १० | ३८०७.५० | ७९४४.५० | १२८२४.०० |
| १५ | ५७११.७५ | ११९१६.७५ | १९२३६.०० |
| २० | ७६१५.०० | १५८८९.०० | २५६४८.०० |
| २५ | ९५१८.७५ | १९८६१.२५ | ३२०६०.०० |
| ५० | १९०३७.५० | ३९७२२.४० | ६४१२०.०० |
| व्याज दर | ८% | ९% | ११% |

### मासिक संचित बचत ठेव

| मासिक ठेव | १२ महिने | २४ महिने | ३६ महिने | ४८ महिने | ६० महिने |
|---|---|---|---|---|---|
| रु. १० | १२७.७० | २७३.४५ | ४४४.७० | ६३६.९० | ८५६.३५ |
| २० | २५५.४० | ५४६.९० | ८८९.४० | १२७३.८० | १७१२.७० |
| ३० | ३८३.१० | ८२०.३५ | १३३४.१० | १९१०.७० | २५६९.०५ |
| ४० | ५१०.८० | १०९३.८० | १७७८.८० | २५४७.६० | ३४२५.८० |
| ५० | ६३८.५० | १३६७.२५ | २२२३.५० | ३१८४.५० | ४२८१.७५ |
| ६० | ७६६.२० | १६४०.७० | २६६८.२० | ३८२१.४० | ५१३८.१० |
| ७० | ८९३.९० | १९१४.१५ | ३११२.९० | ४४५८.३० | ५९९४.४५ |
| ८० | १०२९.६० | २१८७.६० | ३५५७.६० | ५०९५.२० | ६८५०.८० |
| ९० | ११४९.३० | २४६१.०५ | ४००२.३० | ५७३२.९० | ७७०७.१५ |
| १०० | १२७७.०० | २७३४.५० | ४४४७.०० | ६३६९.५० | ८५६३.५० |
| व्याज दर | ११.५०% | १२.५०% | १३.५०% | १३.५०% | १३.५०% |

# दि वांगव्हॅली को-ऑप. क्रेडीट सोसायटी लिमिटेड, मुंबई - ३

रूम नं. ३७ ढोबळे बिल्डींग, २६/२८, जंजीकर स्ट्रीट, मुंबई - ४०० ००३. (कोळीवाडा)

## पुर्नगुंतवणूक ठेव योजना – पाच वर्षात ठेवीची रक्कम दुप्पट मिळणार

| अ. क्र. | वर्ष | ५००/- | १०००/- | २०००/- | ३०००/- | ४०००/- | ५०००/- | १००००/- | मिळणाऱ्या [illegible] |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | १ वर्ष | ५५७/- | १११५/- | २२२९/- | ३३४४/- | ४४५८/- | ५५७३/- | १११४६/- | [illegible] |
| २. | २ वर्ष | ६३३/- | १२६७/- | २५३४/- | ३८००/- | ५०६७/- | ६३३४/- | १२६६८/- | १६.३२% |
| ३. | ३ वर्ष | ७४५/- | १४८९/- | २९७९/- | ४४६८/- | ५९५७/- | ७४४७/- | १४८९३/- | १६.३१% |
| ४. | ४ वर्ष | ८५०/- | १७०१/- | ३४०२/- | ५१०२/- | ६८०३/- | ८५०४/- | १७००८/- | १७.५२% |
| ५. | ५ वर्ष | १०००/- | २०००/- | ४०००/- | ६०००/- | ८०००/- | १००००/- | २००००/- | २०.००% |

**सर्व सभासदांना, ठेवीदारांना व हितचिंतकांना भारतीय स्वातंत्र्याच्या सुवर्णमहोत्सवानिमित्त हार्दिक शुभेच्छा !**

श्री. जयसिंग यशवंत बोत्रे
खजिनदार

श्री. आत्माराम निवृत्ती थोरात
अध्यक्ष

श्री. बाबुराव तुकाराम डाकवे
सचिव

मुद्रण : गणेश ऑफसेट प्रिंटर्स, आगाशिवनगर, कराड. फोन -